# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 09/03/2020 (सोमवार)
# (सकाळ)

---

## नागपूर (ग्रामीण), पोलीसांची अवैधरीत्या दारु विक्री व गाळण करणाऱ्यांविरूद्ध धडक कारवाई

संपुर्ण नागपूर (ग्रामीण) जिल्हयातील पोलीस स्टेशन निहाय अवैधरीत्या दारु विक्री व वाहतुकीबाबत दिनांक 08/03/2020 रोजी पोलीस स्टेशन मौदा, बोरी, बेला, जलालखेडा, नरखेड, कळमेश्वर, खापा, उमरेड, भिवापूर, रामटेक, देवलापार मध्ये एकुण 56 केसेस अवैधरीत्या दारुची विक्री करणाऱ्या गुन्हेगांराविरुध्द दाखल करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये एकुण किंमती 10,52,658/– रुपयाचा माल जप्त करुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारु तसेच 4 मोटरसायकल व 2 मोपेड कार्यवाही दरम्यान जप्त करण्यात आलेली आहेत.

याकरीता नागपूर (ग्रामीण) पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांनी अवैधरीत्या दारुची विक्री व वाहतुक करणाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याहेतू प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत सतर्कपणे पेट्रोलींग व नाकाबंदी करुन कडक कार्यवाही करण्याबाबत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदारांना यांना आदेश दिले आह

## घरफोडी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत विक्तुबाबा देवस्थान मंदीर, रूम क्र. 12 टाकळघाट येथे दिनांक 08/03/2020 चे 03.00 वा. ते 05.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रनय मानीकराव बागडे, वय 39 वर्ष, रा. उमरेड रोड नागपूर हे कुटूंबासह विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे दर्शनासाठी आले. तसेच फिर्यादी हे रात्री भक्ती निवास स्थान येथील रूम मध्ये कुटूंबातील सर्व स्त्रीया रूमचा दार बंद न करता झोपले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने रूममध्ये प्रवेश करून लेडीज बॅग मधील नगदी 21,000/–रू. व लिनोवो कंपनीचा मोबाईल कि. 1,500/–रू., विविध बॅकेचे एटीएम कार्ड व लायसन्स असा एकुण किमंत 22,500/ रु. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रमोद बन्सोड 967360842 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– दिनांक 07/03/2020 चे 18.00 वा. ते 08/03/2020 चे 18.30 वा. फिर्यादीची अल्पवयीन मुलगी 17 वर्षीय 11 महिने पिडीत हिला आरोपी नामे– राजपाल उर्फ खुज्या अमृत इरपाते, वय 27 वर्ष, रा. खापरी ता. हिंगणा, जि. नागपूर याने पीडिते सोबत वारंवार शारीरिक संबंध करून तिला 3 महीण्याचे गर्भवती केले. पिडीत ही गर्भवती असल्याचे माहीती होताच आरोपीने तिला तिच्या पालकाचे कायदेशीर रखवालीतून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 363, 376 2(एन) भादंवि. सहकलम 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि वर्षा मते या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर